जिल्हा अंतर्गत बदली आदेश पुणे जिल्हा बदली ग्रुप वर प्रसिद्ध झाल्यावर बदली झालेल्या शिक्षकांनी सदर आदेशा चे पहिले पान , शेवटचे पान व ज्या पानावर बदली झालेल्या शिक्षकाचे नाव आहे ते पान, अशा पानाचे प्रिंट आणि त्यासोबत ऑनलाईन बदली आदेश प्रिंट घेऊन संबंधित पंचायत समितीकडे कार्यमुक्तीसाठी जावे.

तालुका बदली कक्ष यांना तालुकानिहाय बदली शिक्षक याद्या जिल्हा बदली कक्ष यांचेकडून मिळतील त्यानुसार टिपणी करून संबंधित गटविकास अधिकारी यांची मंजुरी घेऊन त्यांचे आदेशाने सदर शिक्षक कर्मचाऱ्यास कार्यमुक्त करण्याबाबतची प्रचलित पद्धतीने कार्यवाही करावी. तदनंतर संबंधित शिक्षकाने आपल्या शाळेतून कार्यमुक्त व्हावे व नवीन शाळेत रुजू व्हावे. रुजू अहवाल पंचायत समिती कार्यालयकडे सादर करावा.

जिल्हा बदली कक्ष,<br>
पुणे जिल्हा परिषद, पुणे